# कोल्हापूर अर्बन को–ऑप. बँक लि. कोल्हापूर

मुख्य कार्यालय : ५१४ डी, गंगावेश, कोल्हापूर.

**कोअबँ/मु.का./परिपत्रक क्र.७९/२०२३–२०२४** **दिनांक : १३/०६/२०२३**

## मुख्य कार्यालयाकडील सर्व विभाग व सर्व शाखांसाठी

सर्व शाखांना कळविणेत येते की, एन.पी.ए. कर्जातील वसुली प्रभावीरित्या व्हावी यासाठी मा.संचालक मंडळ सभा दि.०८/०६/२०२३ रोजी ठराव क्र.५(३) अन्वये आपल्या बॅकेची एकरकमी कर्ज परतफेड **योजना २०२३ –२४** मंजूर केली आहे. सदर योजनेची नियमावली परिशिष्ट **"अ" ते "प"** सह सोबत पाठवित आहोत. त्याप्रमाणे सदर योजनेच्या अंमल बजावणीकरिता खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) प्रस्तुत एकरक्कमी कर्ज परतफेड योजना २०२३ –२४ ही फक्त सर्व प्रकारच्या कर्जांना लागू होईल.

२) प्रथम परिशिष्ट **"अ"** मधील बॅकेने मंजुर केलेली एकरकमी कर्ज परतफेड योजना २०२३ -२४ चा मसुदा प्रत शाखा नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत यावी. तसेच रत्नागिरी शाखा बंद केली असलेमुळे तेथील पात्र थकबाकीदारांना या योजनेबाबतची माहिती पत्राने अथवा समक्ष भेटुन देणेत यावी. जेणेकरून त्यांची नंतर तक्रार येवू नये.

३) सदर योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या कर्जदारांची शाखा स्तरावर स्वतंत्र रजिस्टरमध्ये नोंद करून त्यांना परिशिष्ट **"क"** मध्ये दिलेल्या मागणी अर्जाचा प्रत देणेत यावी.

४) सदर योजनेमध्ये अर्ज स्विकारताना प्रथम परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेल्या निकष व अटीनुसार त्यांची प्रथमदर्शनी शाखास्तरावर खात्री करावी.

५) शाखेकडे प्राप्त होणारे परिशिष्ट **"क"** प्रमाणे विहित नमुन्यातील मागणी अर्जाची शाखा आवक रजिस्टरमध्ये नोंद करुन अर्जातील तपशीलाप्रमाणे बॅकेतील दप्तरी माहितीवरुन बरोबर असलेची खातरजमा करणेत यावी.

६) शाखेकडे अर्ज स्विकारताना परिशिष्ट **"क"** मध्ये दिलेल्या विहित नमुन्यातील अर्जासोबत नियमावलीप्रमाणे कर्जदारांकडुन एकूण येणेबाकीचे ५% प्रमाणे येणारी रक्कम वसुल करून मुख्य कार्यालयाकडील OTS अनामत खातेवर त्यांचे नावाचे नोंदीसह जमा करणेत यावी.

७) सदर योजनेमध्ये शाखा स्तरावर प्राप्त होणारे सर्व अर्ज पुढील कार्यवाहीसाठी तात्काळ मुख्य कार्यालय, लवाद / वसुली विभाग यांचेकडे विनाविलंब पाठविणेत यावेत.

८) परिशिष्ट **"ई"** मध्ये दिलेल्या नमुन्यात शाखा स्तरावरून संबंधीत कर्जदाराची संपूर्ण माहिती भरून सदर माहिती अर्जासोबत मुख्यालयाकडे पाठविणेची आहे.

कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय कोल्हापूर

९) बॅंकेकडील थकीत कॅशक्रेडिट खातेमध्ये माहिती घेतलेनंतर असे निदर्शनास आले आहे की, सदर खातेवर पुरेशा प्रमाणात व्यवहार होत नाहीत. त्यांचे व्यवसायाचे व्यवहार अन्य बॅंकेकडील चालू खातेवर सुरू असतात. त्याकरीता त्यांनी आपल्या बॅंकेची पूर्वसंमती घेतलेली नसते. शिवाय दरवर्षी वेळेवर आर्थिक पत्रके सादर करत नाहीत. तसेच संपूर्ण टॅक्स ऑडीट रिपोर्ट मागणी करूनही मिळत नाही. अशा खातेंबाबत त्याबाबतची स्वतंत्र माहिती सादर करावी. परंतु त्याचा प्रस्ताव पेंडींग न ठेवता अन्य पुर्तता करून मुख्यालयाकडे पाठवून दयावा.

१०) सदर योजनेचा कालावधी खालीलप्रमाणे राहील.

१) या योजनेमध्ये सहभागी होणेसाठी थकबाकीदारांकडुन दि.२८/०६/२०२३ पासून दि.२८/०२/२०२४ पर्यंत एकूण येणेबाकीच्या ५% रक्कम मुख्य कार्यालयाकडील अनामत खाती भरून नमुना **"अ"** प्रमाणे अर्ज भरून घेणेचा आहे.

२) मंजुर झालेले अर्जास मंजुरी पत्र दिलेपासून एक महिनेच्या आत उर्वरित २०% रक्कम भरावी लागेल.

३) तडजोड रक्कमेपैकी उर्वरित ७५% रक्कमेचा भरणा पुढील ११ महिन्यामध्ये करावयाचा असून त्यास द.सा . द शे.६ % सरळ व्याज पद्धतीने व्याजाची आकारणी केली जाईल या कालावधीत कोणताही हप्ता भरण्यास उशीर झाल्यास त्यावर उशीर झालेल्या मुदतीसाठी व उशीर झालेल्या रकमेवर द.सा.द.शे.२ % दंड व्याज व्याजाची आकारणी केली जाईल.

४) वरीलप्रमाणे या योजनेचा कालावधी जास्तीत जास्त १२ महिने राहिल. या कालावधीत अर्जदार यांनी भरणा न केलेस दिलेली सवलत रद्द करून त्यांनी यापूर्वी भरणा केलेली सर्व रक्कम थकीत व्याजापोटी व नंतर मुद्दलापोटी वसुल करून नियमित व्याजासह व इतर सर्व खर्चासह सर्व येणे रक्कम वसूल करणेचा अधिकार बॅंकेस राहिल.

**वरीलप्रमाणे प्राप्त होणारे अर्जावर खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करणेत आलेली आहे.**

**अ)** प्रथम शाखास्तर व मुख्य कार्यालय वसुली विभागाकडे प्राप्त झालेले विहित नमुन्यातील अर्जावर बॅंकेच्या बॅंकेच्या पॅनलवरील सनदी लेखापालाकडून (चार्टर्ड अकौन्टट) अर्जदार सदर योजनेमध्ये पात्रतेसाठी दिलेल्या निकषांची पुर्तता करीत असलेबाबत खात्री केली जाईल व तसा सदर अर्जावर शेरा नोंद करून देतील.

**ब)** एकरकमी कर्ज परतफेड योजनेतील निकषाप्रमाणे बॅंक दप्तरी प्रस्तूत कर्जखाते अनुत्पादक कर्जाचे संशयित–१ (Doubtful.1) वर्गीकृत झालेले दिवशीच्या लेजर बॅलन्सवर नियमावलीप्रमाणे तडजोड रक्कमेची माहिती तयार करणेची जबाबदारी लवाद / वसुली विभागाची असेल व सदरची माहिती त्यांनी सोबतचे परिशिष्ट **"ब"** नमुन्यात तयार करून देणेची आहे.



अर्बन को-ऑप. बॅंक मुख्य कार्यालय कोल्हापूर

क) वरीलप्रमाणे परिशिष्ट **"ब"** प्रमाणे तयार करणेत आलेल्या तडजोड रक्कमेची छाननी मुख्य कार्यालयाकडील अधिकारी यांचेकडुन पूर्ण केली जाणार आहे. त्यानूसार सदरची आकडेवारी तपासणी करुन बरोबर असल्याबाबत शेरा प्रत्येक प्रस्तावावर नमुद केला जाणार आहे.

ड) वरीलप्रमाणे सदरची आकडेवारी बॅकेचे पॅनेलवरील चार्टर्ड अकौटंट यांचेकडून तपासणी करून ती आकडेवारी बरोबर असलेचे प्रमाणपत्र त्यांचेकडुन घेतले जाईल. त्याकरीता चार्टर्ड अकौटंट यांची सदर कामासाठी फी निश्चित केलेली असून सदरची फी संबंधीत कर्जदार यांचेकडून वसूल करणेची आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील (एकूण कर्ज येणेबाकी) | फी रक्कम |
|---|---|---|
| १ | रू.५०,०००/— | रू.५००/— + GST |
| २ | रू.५०,००१/— ते रू.१,००,०००/— | रू.७५०/— + GST |
| ३ | रू.१,००,००१/— ते रू.३,००,०००/— | रू.१०००/— + GST |
| ४ | रू.३,००,००१/— ते रू.५,००,०००/— | रू.१५००/— + GST |
| ५ | रू.५,००,००१/— ते रू.१०,००,०००/— | रू.२५००/— + GST |
| ६ | रू.१०,००,०००/— च्या पुढे. | रू.५०००/— + GST |

इ) वरीलप्रमाणे पुर्तता झालेले प्रस्ताव एकरकमी कर्ज परतफेड योजनेचे अंमलबजावणीकरीता स्थापन केलेले एकरकमी कर्ज परतफेड समिती या उपसमितीसमोर सादर करून सदर समितीच्या शिफारशीसह प्रथम बोर्ड ऑफ मॅनेजमेंट कमिटीसमोर सदरचे प्रस्ताव सादर करून त्यांचे शिफारशीसह प्रस्ताव नजीकचे बोर्ड मिटींगमध्ये मंजुरीसाठी सादर केले जातील.

प) या योजनेअंतर्गत बोर्ड मिटींगमध्ये मंजूर झालेल्या प्रस्तावांना परिशिष्ट "ड" प्रमाणे मंजुरी पत्र देणेत येईल. तसेच या योजनेअंतर्गत नामंजुर करणेत आलेल्या प्रस्तावांना नामंजुरीचे कारणासह पत्र देणेत येईल.

फ) वरीलप्रमाणे या योजनेतून चालू वर्षात तडजोड केलेल्या थकीत कर्जदारांची माहिती परिशिष्ट "प" प्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर सादर केली जाईल.

भ) सदर कर्ज योजनेअंतर्गत कर्ज खाते बंद करताना कर्जदारास पुढील ५ वर्षापर्यत बॅकेकडुन कोणत्याही प्रकारचे कर्ज अथवा सवलत घेता येणार नाही. तसेच तो बॅकेतील कोणत्याही कर्जास जामीनदार राहू शकणार नाही व योजनेची सवलत घेतलेनंतर त्याची नोंद केडिट इन्फर्मेशन कंपनी (सिबील) कडील रेकॉर्डवर होणार आहे याची पूर्व कल्पना संबंधीत कर्जदारास देणेत यावी. जेणेकरून नंतर तक्रार येवू नये.

मा. सुप्रिम कोर्ट यांनी दि.१५/१२/२०२१ रोजी Civil Appeal No.7430/2021 या केसमध्ये थकीत कर्जदारांस एकरकमी कर्ज परतफेड योजनेचा हक्क राहणार नाही असा महत्वपूर्ण निकाल दिलेला आहे. त्यामूळे थकीत कर्ज येणे वसूलीची खात्री होत असलेस कर्जास पुरेसे तारण असलेस तारण विक्रीतून थकीत कर्जाची संपूर्ण वसुली होणेची शक्यता असलेस सादर झालेला OTS प्रस्ताव नामंजूर करणेचा अधिकार बॅकेस राहील.

**सोबत — या योजनेची संपूर्ण माहिती परिशिष्ट "अ" ते "प" सोबत जोडली असून तो या परिपत्रकाचा एक भाग आहे.**

| वसुली अधिकारी | डेप्युटी जनरल मॅनेजर | मुख्य कार्यकारी अधिकारी |
|---|---|---|
| श्री. समाधान पाटील | श्री.धनंजय पाटील | श्री. विश्वनाथन के. |

दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय कोल्हापूर

# दि कोल्हापूर अर्बन को—ऑप. बँक लि. कोल्हापूर

मुख्य कार्यालय : ५१४ डी, गंगावेश, कोल्हापूर.

## परिशिष्ठ — अ

| | |
|---|---|
| 1 | **योजनेचे नाव : एकरकमी कर्ज परतफेड योजना 202३ –२४** |
| 2 | **योजनेसाठी पात्र कर्जदार :** |
| अ | **दि.31/03/2022 अखेर** जी कर्ज खाती अनुत्पादक कर्जाच्या संशयित किंवा बुडित वर्गवारीत समाविष्ट केलेली असतील अशा सर्व कर्ज खात्यांना ही योजना लागू होईल. परंतु |
| ब | **दि.31/03/2022 अखेर** अनुत्पादक कर्जाच्या "सबस्टँडर्ड" वर्गवारीत समाविष्ट झालेल्या व नंतर दि. 28/02/2023 पर्यंत संशयित अगर बुडित वर्गवारीत गेलेल्या कर्ज खात्यांनाच ही योजना लागू होईल. |
| 3 | **योजनेसाठी अपात्र कर्जदार :** रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार सदर योजना ही पुढील कर्जांना लागू होणार नाही. |
| अ | फसवणूक, गैरव्यवहार करुन घेतलेली कर्जे व जाणीवपूर्वक थकविलेली कर्जे |
| ब | रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांचे अथवा आदेशांचे उल्लंघन करुन वितरित केलेली कर्जे |
| क | आजी व माजी संचालकांना व त्यांच्याशी हितसंबंध असणाऱ्या भागीदारी संस्था/कंपन्या/ संस्था यांना दिलेल्या कर्जांना अथवा त्यांची जामिनकी असणाऱ्या कर्जांना रिझर्व्ह बँकेच्या पूर्व परवानगीशिवाय सदर सवलत देता येणार नाही. |
| ड | संचालकांच्या कुटुंबातील व्यक्तींना दिलेल्या कर्जासाठी अथवा ते जामीनदार असलेल्या कर्जांना सदर योजना लागू होणार नाही. येथे 'कुटुंब' म्हणजे मसका कलम 75(2) पत्नी, पती, वडील, आई/सावत्र आई, भाऊ/सावत्र भाऊ, बहीण/सावत्र बहीण, बहीणीचा नवरा, मुलगा/सावत्र मुलगा, मुलगी/सावत्र मुलगी, जावई किंवा सून. |
| इ | पगारदारांच्या मालकांशी जर पगार कपातीचा करार झाला असेल तर अशा पगारदारांना दिलेल्या खावटी कर्जासाठी सदर योजना लागू होणार नाही. |
| फ | दि.31/03/2022 अखेर पूर्नबांधणी केलेली व स्टॅंडर्ड वर्गवारीत असलेल्या कर्ज खात्यांना सदर योजनेत समाविष्ट केलेले नाही. |
| ह | रु.10 कोटींच्या वरील येणे बाकी असलेल्या कर्जांना सदर योजना लागू करण्यासाठी मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकार संस्था पुणे यांच्या कार्यालयाकडुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. |
| 4 | **योजनेची मुदत –** |

दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय * कोल्हापूर *

| | |
|---|---|
| | |
| 5 | **योजनेची व्याप्ती :** |
| अ | **ही योजना सर्व प्रकारच्या कर्जांना तसेच कर्जा व्यतरीक्त दिलेल्या तात्पुर्ती उचल मर्यादा, बिल डिस्काऊट,व इतर आर्थिक सवलतीना लागू होईल.** |
| ब | जेथे कर्जदाराची एकापेक्षा जास्त कर्ज खाती असतील व त्यापैकी एखादे/काही कर्ज खाती अनुत्पादक झाली म्हणून इतर सर्व कर्ज खाती 'समूह कर्जे' म्हणून अनुत्पादक होतात. तर सर्व कर्ज खात्यांना एकरक्कम परतफेड योजनेची सवलत देण्यात येईल. |
| क | **सदर योजनेनुसार एखाद्या कर्जदारास अपवादात्मक परिस्थितीत वेगळा विचार करणेचा अधिकार फक्त संचालक मंडळास राहील.** |
| ड | मे.सुप्रिम कोर्टाचा सिव्हिल अपील नं. 7411/2021 अन्वये दिलेल्या निवाड्याप्रमाणे एखाद्या थकित कर्जदारास एक रक्कमी कर्ज फेडीसाठी, कर्जास तारण मिळकतीची किंमत, कर्ज वसुलीसाठी केलेले प्रयत्न व कर्ज वसुलीसाठी संधी या बाबी विचारात घेऊन निर्णय घेतला जाईल. |
| 6 | **योजनेसाठी तडजोडीचे सूत्र :**<br>रिझर्व्ह बँकेने उत्पन्न संकल्पना : जिंदगीचे वर्गीकरण व अनुत्पादक जिंदगीसाठी करावयाच्या तरतुदीसाठी दि.01/04/2022 रोजी प्रसिद्ध केलेल्या मास्टर सर्क्युलरनुसार कर्ज खात्यांचे केलेले वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे : |

| अ. | जिंदगी वर्गीकरण | थकीत कालावधी |
|---|---|---|
| 1 | सब स्टँडर्ड जिंदगी (Sub-standard) | अनुत्पादक झाल्यानंतर 12 महिने पर्यंत |
| 2 | संशयित–1 (Doubtful-1) | सब स्टँडर्ड–1 झाल्यानंतर 12 महिने |
| 3 | संशयित–2 (Doubtful-2) | संशयित –1 झाल्यानंतर 24 महिने पर्यंत |
| 4 | संशयित–3 (Doubtful-3) | संशयित –1 झाल्यानंतर 36 महिने चे वरील |
| 5 | बुडीत (Loss) | बँक, लेखापरिक्षक, सहकार विभाग यांनी प्रमाणित केलेनुसार |

| | |
|---|---|
| अ | ज्या दिवशी संबंधित कर्ज खाते हे अनुत्पादक कर्जाच्या संशयित–1 (Doubtful-1) या वर्गवारीत वर्गीकृत केले असेल त्या दिवशीचा लेजर बॅलन्स, येणे व्याज व इतर खर्च अशी एकत्रित रक्कम येणे बाकी समजणेत येईल.<br>उदा. दि.01/04/2015 रोजी रू. 5 लाख कर्ज अदा केले असेल व एनपीए तारीख दि.31/03/2018 रोजी होवून दि.31/03/2019 रोजी संशयित–1 राहिल. त्या तारखेस एकूण व्याजसह येणेबाकी रू. |

अर्बन को-ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय कोल्हापूर

| | |
|---|---|
| | 3,35,000 /– आहे. त्यामध्ये मुददल रू.2,18,000 /– + व्याज रू.1,02,000 /– + इतर खर्च रू.15,000 /– असे एकत्रित येणे रक्कम. |
| ब | वरील **रकमेपैकी केवळ मुददल रक्कमेवर 6%** दराने सिंपल पध्दतीने व्याज आकारणी करुन परतफेडीसाठी 1+11=12 महिनेची अंतिम मुदत राहील. |
| क | वर कलम ''अ'', ''ब'' मध्ये नमूद केलेल्या एकत्रित रकमेतून कर्जदाराने अनुत्पादक कर्जाच्या संशयित–1 (Doubtful-1) या वर्गवारीत सदर खाते वर्गीकृत केल्यानंतरच्या तारखेनंतर भरणा केलेल्या रकमेची वजावट (अ अधिक ब मध्ये नमूद एकत्रित रकमेतून) दिल्यानंतर जी रक्कम येणे राहील ती किमान **''तडजोड रक्कम''** समजली जाईल. |
| ड | तडजोड रक्कम परिशिष्ट अ प्रमाणे निश्चित करावी व तडजोड रक्कम उणे (निगेटीव्ह) येत असलेस तर तशी रक्कम कर्जदारांस परत न करता संबंधीत कर्ज खाते या योजने अंतर्गत बंद करावी. |
| **7** | **बँकेने करावयाची कार्यवाही :** |
| अ | योजना स्विकारल्यानंतर त्याची माहिती सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर लावणेत येईल. तसेच या योजनेची प्रत बॅकेच्या वेबसाईटवरही प्रसिध्द करणेत येईल. |
| ब | योजनेच्या अंमलबजावणीसाठी बँकेचे अध्यक्ष, दोन/तीन संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी हे त्या ओटीएस उपसमितीचे सदस्य असतील. सदर समितीने शिफारस केलेल्या प्रकरणांना प्रथम बोर्ड ऑफ मॅनेजमेंट समिती शिफारस करेल व त्यानंतर मा.संचालक मंडळाच्या पुढील सभेमध्ये मंजूरी घेणेची आहे. |
| क | या योजने अंतर्गत नामंजूर करण्यात येणाऱ्या सर्व कर्जदारांना कारणासह नामंजूरीचे पत्र देणेत येईल. |
| ड | एन.पी.ए. ची तारीख व वर्गवारी बँकेच्या दफ्तराप्रमाणे व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येईल. कर्ज परतफेडीसंबंधी बाबींमधील वाद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 चे कलम 91 अंतर्गत सोडविण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे सदर योजनेचा लाभ देणेचे अनुषंगाने अगर तडजोड रकमेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत संबंधित तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणेत येईल. |
| ई | तडजोड रकमेचा भरणा कर्जदाराने बँकेतून नविन कर्ज घेऊन करावयाचा नाही. बँकेतील अशा इतर कोणत्याही कर्जातून तडजोड रकमेचा भरणा करणेचा नाही. |
| प | सदर कर्ज परतफेड योजनेअंतर्गत कर्ज खाते बंद करताना संबंधित कर्जदारास नव्याने कर्ज /सवलत देता येणार नाही. कर्जदारास **पुढील पाच वर्षापर्यंत** बँकेकडून कोणत्याही प्रकारचे कर्ज/सवलत घेता येणार नाही. तसेच तो बँकेतील **कोणत्याही कर्जास/सवलतीस पाच वर्षे जामीन** राहू शकणार नाही. |
| फ | सदर योजनेप्रमाणे एकरक्कमी कर्ज परतफेडीकरीता अर्ज स्विकारणे, मंजुर करणे अगर नामंजुर करणे इ. चे सर्व अधिकार मा. संचालक मंडळास राहतील. |
| ब | सदर योजनेप्रमाणे एकरक्कमी परतफेडीकरीता आलेल्या अर्जावर निर्णय घेताना, तडजोड रक्कम भरणेचे नियोजन (Cash flow), तारणाची किंमत व कर्जदाराचे सहकार्य याबाबी विचारात घेतल्या जातील. |
| भ | सदर योजनेत सवलत घेतलेल्या कर्जदारांची माहिती त्यांचे केडिट इन्फर्मेशन कंपन्याकडे पाठविणेत येईल. |

अर्बन को-ऑप. बँक मुख्य कार्यालय कोल्हापूर

| | |
|---|---|
| | |
| 8 | **परतफेड करण्यासाठी कालावधी :** |
| अ | या योजनेअंतर्गत दि.28/02/2023 पर्यंत अर्ज प्राप्त झालेले प्रस्ताव मंजुर झालेनंतर त्यांना दिले जाणारे मंजुरीचे पत्र प्राप्त झालेपासून कर्जदाराने तडजोड रक्कमेपैकी 25% रक्कम (अर्जासोबत भरलेली **5%** रक्कम गृहीत धरुन) एक महिन्यात भरणे आवश्यक आहे. व उर्वरीत रक्कम भरणेकरीतां 11 महिनेंचा कालावधी राहिल. |
| ब | i) कर्जदाराने या एकरकमी कर्ज परतफेड योजनेनुसार करावयाच्या अर्जासोबत, सदर कर्ज प्रकरण ज्या दिवशी अनुत्पादक कर्जाच्या, संशयित–1 **(Doubtful-1)** या वर्गवारीत वर्गीकृत केले असेल, त्या दिवशीच्या लेजर बॅलन्सच्या (मुद्दल + व्याज) **किमान 5%** रक्कम रोखीने / डी डी ने भरणे आवश्यक आहे. सदरची रक्कम NEFT/RTGS ने स्विकारु नये. |
| | ii) एकरकमी परतफेड योजनेतर्गत अर्ज मंजूरीचे पत्र प्राप्त झाल्यापासून एक महिन्याचे आत कर्जदाराने तडजोड रकमेच्या किमान **25%** रक्कम भरल्यास उर्वरित रक्कम भरण्यास पुढील जास्तीत जास्त 11 मासिक हप्त्यांचा कालावधी देता येईल. कर्जदाराने सदर योजनेसाठी अर्ज करतानां लेजर बॅलन्सच्या 5% प्रमाणे भरलेली रक्कम तडजोड रकमेच्या 25% प्रमाणे रक्कम जमा करताना वजावट करुन उर्वरीत रक्कम जमा केली पाहिजे. कर्जदाराने 1 महिन्यात सदर रक्कम न भरल्यास सदर योजनेचा लाभ घेणेस कर्जदाराने नकार दिला आहे. असे समजून कर्जदाराने अर्जासोबत भरणा केलेली 5% अनामत रक्कम बॅक सदर कर्जास जमा करुन घेतली जाईल. |
| | iii) उर्वरित 75% रकमेचा भरणा पुढील 11 मासिक हप्त्यांमध्ये करावयाचा असून, त्यास द.सा.द.शे. **6%** दराने सरळव्याज पध्दतीने व्याजाची आकारणी केली जाईल. या कालावधीत हप्ता भरणेस उशीर झालेस त्यावर उशीर झालेल्या मुदतीसाठी अथवा उशीर झालेल्या रक्कमेवर द.सा.द शे. **२%** दंड व्याज व्याजाची आकारणी केली जाईल. |
| क | वरीलप्रमाणे एक रकमी परतफेडीचा कोणताही हप्ता देय दिनांकास अर्जदाराने न भरल्यास, अर्जदारास दिलेली सवलत रद्द करुन त्यांनी यापूर्वी भरणा केलेली सर्व रक्कम प्रथम थकित व्याजापोटी व नंतर मुदलापोटी वसूल करुन नियमित व्याजासह व इतर सर्व खर्चासह सर्व येणे रक्कम वसूल करण्याचा अधिकार बॅकेस राहील. |
| ड | सदर योजनेप्रमाणे सवलत मंजुर कर्जदाराने दिलेल्या परतफेडीच्या तारखेस नियमित फेड न केलेस सदरची सवलत रद्द होवून मुळ कर्ज मंजुरीप्रमाणे व करारपत्राप्रमाणे परतफेड विचारात घेवून खातेचा एनपीए दर्जा निश्चित होईल. |

अर्बन को-ऑप. बँक मुख्य कार्यालय कोल्हापूर

| 9 | **योजनेसंबंधी इतर तरतुदी :** |
|---|---|
| अ | एक रकमी कर्ज परतफेड योजनेंतर्गत सवलत मिळणा–या कर्ज खात्यांना महाराष्ट्र सहकार नियम, 1961 चे नियम 49 अंतर्गत नमूद केलेली निर्लेखनाची प्रकिया लागू होणार नाही. |
| ब | या योजनेअंतर्गत तडजोड केलेल्या खात्यांची सर्व माहिती वार्षिक सर्वसाधारण सभेने नोंद घेण्यासाठी पुढील वार्षिक सभेस, स्वतंत्र विषयाद्वारे देण्याचे बंधन बॅकांवर राहील. |
| क | या योजनेंतर्गत होणा–या वसुलीवर सरचार्ज लागणार नाही. |
| ड | जामिनदार हे सहकर्जदार असल्याने या योजनेअंतर्गत कर्जदाराने अर्ज केला नाही तर तो जामिनदारांनाही अर्ज करता येईल. |
| इ | सदर योजनेप्रमाणे एकरकमी कर्ज फेडीची अंदाजे रक्कम विचारात घेउन ती उभारणी करणेचे स्त्रोत व रक्कम मिळणेच्या तारखेसहची यादी संबंधीत कर्जदाराने सोबत जोडणे आवश्यक आहे. |
| फ | सदर एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत सोबतची परिशिष्ठ जोडलेली आहेत ती या योजनेचा एक भाग आहे.<br>परिशिष्ट – ब (तडजोडीचे सुत्र),<br>परिशिष्ट – क (अर्जदाराने करावयाच्या अर्जाचा नमुना),<br>परिशिष्ट – ड (मंजुरी पत्राचा नमुना),<br>परिशिष्ट – ई (शाखेने भरुन दयावयाचा छाननी फॉर्म)<br>परिशिष्ट – प (वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर द्यावयाची माहिती) |

कोल्हापूर अर्बन को-ऑप बँक मुख्य कार्यालय कोल्हापूर

## परिशिष्ट – ब
## तडजोडीचे सूत्र

उदाहरण :

| अ.क्र. | कर्जदाराची कर्ज खाती | रक्कम रु. |
|---|---|---|
| 1 | मुदत कर्ज | रु.5.00 लाख |

| | | |
|---|---|---|
| डी–1 चे मुद्दल | रु.5.00 लाख | |
| अधिक | | |
| डी–1 चे येणे व्याज | रु.1.00 लाख | |
| डी–1 चे एकूण येणे | रु.6.00 लाख | (अ) |
| **अधिक** | | |
| रु.5 लाखावर म्हणजेच एकूण येणे रकमेवर तडजोडीच्या दिनांका पर्यंत (दि.31/03/2024 गृहीत) | | |
| द.सा.द.शे. 6% दराने सरळव्याज | रु.1.50 लाख | |
| **अधिक** | | |
| अ. जाहिरात खर्च | रु.0.10 लाख | |
| ब. विमा खर्च | रु.0.05 लाख | |
| क. न्यायालयीन बाबीसाठी केलेला प्रत्यक्ष खर्च | रु.0.35 लाख | |
| एकूण (अ+ब+क) | रु.0.50 लाख | (ब) |
| **वजा** | | |
| डी–1 नंतर बँकेत भरणा केलेली रक्कम | रु.1.50 लाख | |
| **तडजोड रक्कम** | रु.6.50 लाख | (क) |

टीप : 1. वर कलम (अ) मधील रकमेच्या 5 टक्के रक्कम अर्जदाराने अर्ज करतेवेळी भरणा करणे आवश्यक आहे.

दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय कोल्हापूर

# परिशिष्ट – क
## अर्जदाराने करावयाच्या अर्जाचा नमुना

दि.  /  /2023

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**दि कोल्हापूर अर्बन को–ऑप. बँक लि., कोल्हापूर**
**मुख्य कार्यालय, गंगावेश, कोल्हापूर**

**विषय : "एकरकमी कर्ज परतफेड योजने" अंतर्गत सवलत मिळणेबाबत विनंती अर्ज**

**संदर्भ : माझे / आमचे थकित कर्ज खाते नं. ————————— शाखा ——————————**

महोदय,

माझे / आमचे उपरोक्त संदर्भित कर्ज खाते नं. ——————— थकित असून, बँकेच्या पुस्तकात अनुत्पादक कर्जाच्या संशयित–1 (**Doubtful-1**) या वर्गवारीत वर्गीकृत केली आहेत.

माझ्या / आमच्या कर्ज खात्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | कर्ज खात्याचा प्रकार | अनुत्पादक कर्जाचे वर्गीकरण | डी–1 ची थकीत रक्कम (मुद्दल + व्याज) |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |

सदर कर्ज खात्यावरील येणे रक्कम मला / आम्हांला बँकेच्या "एकरकमी कर्ज परतफेड योजने" अंतर्गत भरावयाची असून, या योजनेअंतर्गत मी / आम्ही देय असणारी तडजोडीची रक्कम मला / आम्हांला त्वरित कळवावी.

मी / आम्ही ———————————————————————————— शपथपूर्वक सांगतो की, **दि कोल्हापूर अर्बन को–ऑप. बँकेची** "एकरकमी कर्ज परतफेड योजने" च्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून, त्या मला / आम्हांला मान्य आहेत व मी / आम्ही त्यांचे पालन करण्याची हमी देतो. तसेच मी / आम्ही केलेल्या या अर्जास, माझ्या / आमच्या कर्जास जामिनदार असलेल्या सर्वांची मान्यता आहे. तसेच सदर योजनेतील तरतुदीप्रमाणे तडजोड रक्कम भरणेचे नियोजनाबाबत (Cash Flow) बॅकेने माझेकडे / आमचेकडे मागणी केलेस ती मी / आम्ही विनाविलंब सादर करीन. माहिती न दिलेमुळे ओटीएस प्रस्ताव मंजुर न झालेस त्याची संपूर्ण जबाबदारी माझेवर / आमचेवर राहिल. त्याबाबत नंतर मी / आम्ही तक्रार करणार नाही.

सदर योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुढील पाच वर्षापर्यंत बँकेकडून कोणत्याही प्रकारचे कर्ज/सवलत मला / आम्हांला घेता येणार नाही तसेच इतर कोणत्याही कर्जास/सवलतीस पुढील पाच वर्षे मी / आम्ही जामीन राहू शकणार नाही तसेच या योजनेत सवलत घेतल्यानंतर त्याची नोंद केडीट इन्फर्मेशन कंपनी (सिबील) कडील रेकॉर्डवर होणार आहे. याची मला / आम्हांला कल्पना असून त्यास माझी / आमची मान्यता आहे.

सदर योजनेतील अटींनुसार, अर्जासोबत मी माझ्या संबंधित कर्जाकरीतां अनामत खात्यांवर डी–1 रोजी येणे असलेल्या लेजर बॅलन्स + त्या दिवसांपर्यंतचे येणे व्याज अशा रु.————— इतक्या येणे रकमेच्या **5%** म्हणजेच रु. ——————— चा डिमांड ड्राफ्ट/पे–ऑर्डर सोबत जोडत आहे/रोख भरणा केलेला आहे.

तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन एकरकमी कर्ज परतफेड योजनेची सवलत मला द्यावी अशी विनंती आहे.

कळावे.

आपला विश्वासु,

सही/–
(कर्जदाराचे नाव)

कर्ज खाते नं. ————————
शाखेचे नाव ————————

अर्बन को–ऑप. बँक कोल्हापूर मुख्य कार्यालय

## परिशिष्ट – ड
## मंजुरीपत्राचा नमुना

दि.

प्रति,
अर्जदार ----------------------------------------
----------------------------------------

**विषय : "एकरकमी कर्ज परतफेड योजने" अंतर्गत सवलत मिळणेबाबत विनंती अर्ज**

**संदर्भ : 1. आपला दि. --/--/------ रोजीचा विनंती अर्ज**
**2. आपले थकित कर्ज खाते नं. ------ शाखा ------------**

महोदय,

आपल्या उपरोक्त संदर्भिय अर्जानुसार एकरकमी कर्ज परतफेड योजने चा अर्ज मा.संचालक मंडळाने, दि. --/--/------- रोजीच्या सभेमध्ये मंजूर केलेला आहे. त्यानुसार आपणांस "एकरकमी कर्ज परतफेड योजने" अंतर्गत रक्कम रु. ----------/- इतकी "तडजोड रक्कम" **(Settlement Amount)** निश्चित केली असून, या योजनेत सहभागी होणेसाठी आपण अर्जासोबत भरलेली **5%**रक्कम रु. -------- /- बँकेस दि.--/--/------- रोजी प्राप्त झाली आहे. उर्वरित रकमेचा भरणा आपण पुढीलप्रमाणे करावयाचा आहे –

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| अ) | 1 महिन्याच्या आंत तडजोड रकमेच्या **25%** (अर्जासोबत भरलेली **5%** रक्कम गृहीत धरुन) प्रमाणे भरावी लागणारी रक्कम. | |
| ब) | पुढील 11 महिन्यांत उर्वरीत **75%** प्रमाणे भरावी लागणारी रक्कम | |

**परतफेडी संबंधी अटी व शर्ती :**

1. एकरकमी कर्ज परतफेड योजना अंतर्गत अर्ज मंजुरीचे पत्र प्राप्त झाले पासुन कर्जदारांने तडजोडीची सर्व रक्कम भरणे अवश्यक आहे. अथवा
2. एकरकमी कर्ज परतफेड योजना अंतर्गत अर्ज मंजुर केल्या नंतर कर्जदारांने तडजोड रक्कमेच्या किमान **25%** रक्कम मंजुरी च्या दिनांका पासुन एकमहिन्याच्या आत भरल्यास उर्वरीत रक्कम भरणेस पुढील जास्ती जास्त 11 मासिक हप्त्याचा कालावधी देण्यात येईल. उर्वरित **75%** रकमेचा भरणा पुढील 11 मासिक हप्त्यांमध्ये करावयाचा असून, त्यास द.सा.द.शे. 6ः दराने सरळव्याज पध्दतीने व्याजाची आकारणी केली जाईल. या कालावधीत हप्ता भरणेस उशीर झालेस त्यावर उशीर झालेल्या मुदतीसाठी अथवा उशीर झालेल्या रक्कमेवर द.सा.द शे. **२%** दंड व्याज व्याजाची आकारणी केली जाईल. सदर एक महिन्यात **25%** रक्कम न भरलेस सदर योजनेचा लाभ घेण्यास कर्जदाराने नकार दिला आहे असे समजून कर्जदारांने अर्जा सोबत भरणा केलेली **5%**रक्कम मुददलात जमा करुन घेतली जाईल. कर्जदारांने तडजोडीची सर्व रक्कम भरणे अवश्यक आहे.

(अधिकृत अधिकारी)
दि कोल्हापूर अर्बन को–ऑप. बँक लि., कोल्हापूर

दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक मुख्य कार्यालय * कोल्हापूर *

दि कोल्हापूर अर्बन को–ऑप.बॅक लि, कोल्हापूर
514 डी वॉर्ड, गंगावेश, कोल्हापूर.

परिशिष्ट – "ई"

एकरकमी कर्ज परतफेड अर्जासोबत शाखेने भरून द्यावयाचा छाननी / टिप्पणी फॉर्म

1) कर्जदाराचे नाव :

पत्ता :

मोबाईल नंबर :

नोकरी / व्यवसाय :

नोकरी / व्यवसाय पत्ता :

दरमहा उत्पन्न :

कर्ज प्रकार :

कर्ज खाते नं. :

कर्ज मागणी रक्कम :

पूर्वीच्या कर्जाचे फेडीचा तपशिल / दंड रक्कम :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कर्ज रक्कम | | | | |
| दंड व्याज | | | | |

पॅन नंबर :

2) जामिनदार नं. 1

जामिनदाराचे नाव :

पत्ता :

मोबाईल नंबर :

नोकरी / व्यवसाय

नोकरी / व्यवसाय पत्ता :

पॅन नंबर :

3) जामिनदार नं. 2

जामिनदाराचे नाव :

पत्ता :

मोबाईल नंबर :

नोकरी / व्यवसाय

नोकरी / व्यवसाय पत्ता :

पॅन नंबर :

4) कर्ज मंजुरीसाठी शाखा शिफारस : होती / नव्हती

मुख्य कार्यालय ऑफिस शिफारस : होती / नव्हती

5) कर्ज मंजुरीची अधिकार कक्षा : शाखा प्रमुख / क्रेडिट मॅनेजर / चिफ ऑपरेटींग ऑफिसर / मुख्य कार्यकारी अधिकारी / कर्ज समिती / संचालक मंडळ

6) कर्जाचे कारण :

7) कर्ज देणेबाबत वैयक्तिक शिफारस – असलेस – त्याची माहिती

कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय कोल्हापूर

सेवक / अधिकारी / संचालकांचे नाव :

8) अ) तारण तपशिल / सध्याची किंमत –

ब) वाहन तारण असलेस, थकबाकीमुळे जप्तीची कारवाई झाली आहे काय होय / नाही.

9) सिबील रिपोर्टनुसार कर्जाची माहिती :
(यापूर्वी सिबील रिपोर्ट घेतला नसेल तर तो कर्ज विभागाकडून घेऊन माहिति भरावी.)
स्कोअर :
कर्ज : मंजूर कर्ज रु. येणे बाकी रु.
शेरा :

अन्य संस्थेतील कर्जे :

10) कर्जाची परतफेड :
1. सुरुवातीस कर्जाची नियमित फेड / अनियमित फेड
2. कर्जाचे हप्ते नियमित भरत नाहीत / एकदम हप्ता भरतात.
3. उत्पन्न कमी झालेने हप्त्याची रक्कम कमी भरली जाते.
4. कॉट्रॅक्ट व्यवसाय आहे. कामाची बिले आलेनंतर तिमाही / सहामाही / वार्षिक हप्ते भरतात. नियमित हप्ता भरत नसलेने कर्ज खाते वर्षभर काही वेळा एन.पी.ए. वर्गीकृत होते.
5. एन.पी.ए. कारण –
कौटुंबिक कारणे / वैद्यकिय कारण / कोरोना कालावधीत व्यवसाय बंद राहिलेने / भागीदारीतील वाद / न्यायप्रविष्ठ बाबी / कुळ कायदे व इतर कारणे. –
6. इतर (दरमहा पेन्शन जमा होते. परंतु एस.आय. नोंद केली नसलेने कर्ज वसुली झाली नाही)
7. कर्ज खाते एन.पी.ए. वर्गीकृत होणेचे कारण – स्वतंत्र रिपोर्ट
(कर्ज मंजुरीचे वेळी ॲडव्हान्स चेक घेतले होते. परंतु वसुलीसाठी पाठविले नाहीत)

11) कर्ज खाते एन.पी.ए. झालेची तारीख :

12) कर्ज खाते एन.पी.ए. झालेची कारणे : ( ✔ अशी टीक करा.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | नोकरीतून कमी | होय : | नाही : | |
| 2. | व्यवसायाची स्थिती – | बंद : | चालू : | |
| 3. | उत्पन्नापेक्षा कर्ज जास्त | होय : | नाही : | |
| 4. | जाणीवपूर्वक थकबाकी | होय : | नाही : | |
| 5. | कर्जदार आजारी आहे / बेपत्ता आहे / व्यसनाधिन / मयत आहे. ———— | | | |
| 6. | नैसर्गिक आपत्ती ———————— | | | |
| 7. | कर्जदाराचे उत्पन्नस्तोत्र कर्ज मंजुरीचे वेळी दिलेले आई / वडिलांचे पेन्शनचे उत्पन्न बंद झाले आहे | | होय : | नाही : |
| 8. | कर्जाचे रकमेचा इतर ठिकाणी वापर | | होय : | नाही : |

13) कर्ज वसुलीसाठीचे प्रयत्न : (पर्यायापुढे ✔ अशी टीक करा.)
1. थकबाकी भरणेसाठी फोनद्वारे पाठपुरावा केला.
2. थकबाकी नोटीस तपशिल
3. वसुली कमिटीपुढे हजर राहणेसाठी नोटीस
4. समक्ष नोकरी / व्यवसाय ठिकाणी भेट देवून विनंती
5. लवाद दावा – म.स.सं.का.क. 91 / 101 नोटीस / कोर्टाचे समन्स / डिमांड नोटीस / जप्ती नोटस
6. सरफेसी कायदा 2002 अंतर्गत कारवाई तपशिल – कलम 13 (2) / कलम 13 (4) नोटीस / प्रतिकात्मक / प्रत्यक्ष ताबा
7. तारण मिळकत / तारण माल / वाहनाचा प्रत्यक्ष ताबा
8. विक्री कारवाई
9. कर्ज थकबाकीबाबत दिलेला चेक परत आलेने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम 138 अंतर्गत कारवाईचा तपशिल

क्लार्क सुपरवायझर शाखा व्यवस्थापक

द कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय कोल्हापूर

## परिशिष्ट – प

### वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर द्यावयाची माहिती

**विषय : बँकेची ''एकरकमी कर्ज परतफेड योजना'' अंतर्गत तडजोड केलेल्या थकित कर्ज खात्यांची माहिती देणे व संचालक मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे.**

**(कालावधी दि.--------- ते दि. ----------)**

| | | |
|---|---|---|
| 1 | तडजोड झालेल्या एकूण कर्ज खात्यांची संख्या | रु. |
| 2 | तडजोड झालेल्या खात्यांमधील एकूण कर्ज मंजूर रक्कम | रु. |
| 3 | तडजोड झालेल्या खात्यांवरील दि.-------- अखेरीचे एकूण येणे (मुद्दल + व्याज) | रु. |
| 4 | संबंधित तडजोड खात्यांवर आजपर्यंतचे एकूण येणे व्याज | रु. |
| 5 | संबंधित तडजोड खात्यांमध्ये आजपर्यंत वसुल झालेली रक्कम (मुद्दल + व्याज) | रु. |
| 6 | संबंधित तडजोड खात्यांची आजपर्यंतची एकूण येणे रक्कम | रु. |
| 7 | संबंधित तडजोड खात्यावर बँकेने दिलेली येणे व्याजातील एकूण सूट | रु. |

टीप : सदर विषय हा केवळ नोंद घेण्याचा असल्याने यासंबंधी सूचक व अनुमोदक घेऊन ठराव मंजूर करण्याची आवश्यकता नाही.

**चर्चेअंती वरील प्रमाणे बॅंकेने स्वतःची परिशिष्ठ अ ते प नुसार एकरकमी कर्ज परतफेड योजना 2023–24 (OTS Policy) लागू करणेचे सर्वानुमते मंजूर.**

अर्बन को-ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय कोल्हापूर